# पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण

पोलीस मुख्यालय आडगाव, नाशिक-पिन ४२२००३

दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१० - E.Mail- pilcbnskr@gmail.com


---

## प्रेसनोट

दिनांक:- १६/१०/२०१८

## ग्रामीण पोलीस दलाचे - जागर स्त्री आरोग्याचा उपक्रमाअंतर्गत सॅनिटरी नॅपकिन वेंडींग मशिन सुविधा व महिलांच्या आरोग्य विषयक समस्या व उपाय योजना व्याख्यानाचे आयोजन

---

हल्लीच्या धकाधकीच्या जीवनात महिलांना घरगुती कामासह कुटूंबाची सर्वस्वी जबाबदारी पार पाडावी लागते, नोकरदार महिलांना तर नोकरी आणि कुटूंब अशी दुहेरी जबाबदारी पार पाडतांना स्वत:च्या आरोग्याकडे लक्ष द्यायला वेळच मिळत नाही. महिलांचे आरोग्य बिघडले, तर कुटूंबाचे स्वास्थ्य बिघडते. त्यामुळे महिलांनी स्वत:चे आरोग्य निरोगी राखणे अत्यंत महत्वाचे आहे, यासाठी **मा.पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो** यांचे संकल्पनेतुन **ग्रामीण पोलीस दलातर्फे - जागर स्त्री आरोग्याचा** उपक्रमाअंतर्गत आज रोजी आडगाव पोलीस मुख्यालयातील बहुउद्देशीय हॉल येथे महिलांच्या आरोग्य विषयक समस्या व उपाय योजना याविषयी व्याख्यान तसेच सॅनिटरी नॅपकिन वेंडींग मशिन सुविधा उद्घाटन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रम प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणुन **नाशिक जिल्हा परिषद अध्यक्षा, मा.ना. श्रीमती शितल सांगळे, सौ.रोहिणी संजय दराडे, सौ.नमिता कोहोक** (मिसेस ग्लोबल युनायटेड लाईफटाईम क्वीन), स्त्रीरोग तज्ञ **डॉ.सुवर्णा प्रदिप पवार**, यांचेसह मनमाड उपविभागाच्या **सहा.पोलीस अधीक्षक रागसुधा आर. मॅडम,** तसेच जिल्हयातील सखी मंचाच्या सदस्या, महाविद्यालयीन तरूणी व पोलीस ठाणेनिहाय महिला पोलीस अधिकारी व महिला कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते. **मा.पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो.** यांनी प्रमुख अतिथींचे स्वागत केले, त्यानंतर कार्यक्रमास सुरूवात झाली, यावेळी महिला पोलीस उपनिरीक्षक श्रीमती सुवर्णा महाजन यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना सादर केली.

महिलांना सन्मानाने जगण्याच्या दृष्टीने सर्वत्र स्वच्छ व सुरक्षित प्रसाधन गृहे उपलब्ध असणे हा महिलांचा हक्क आहे. त्याअनुषंगाने सदर कार्यक्रमप्रसंगी ग्रामीण पोलीस अधीक्षक कार्यालयातील महिला प्रसाधनगृहांमध्ये महिलांसाठी सॅनिटरी नॅपकिन वेंडींग मशिन सुविधेचे **अनावरण प्रमुख अतिथींच्या हस्ते करण्यात आले.** दरम्यान कार्यक्रमात उपस्थित असलेल्या महिला वर्गाला प्रमुख मान्यवरांनी आरोग्य विषयक समस्या व उपाययोजनांबाबत मार्गदर्शन केले. **स्त्री-रोग तज्ञ डॉ. सुवर्णा पवार** यांनी या शिबीरामध्ये महिलांवरील कामाच्या तणावामुळे निर्माण होणा-या समस्या, रोग-व्याधी, अशक्तपणा, वंध्यत्व उपचार, गर्भाशय कॅन्सर, गर्भसंस्कार, तसेच महिलांच्या इतर आजारांवर मार्गदर्शन व औषोधोपचारा बाबत माहिती दिली. तसेच जागतिक **मिसेस ग्लोबल युनायटेड लाईफटाईम क्वीनचा किताब** मिळविणा-या पहिल्या भारतीय महिला **सौ.नमिता कोहोक** यांनी आपले मनोगत व्यक्त करत महिलांना प्रोत्साहित केले, कॅन्सर पिडीतांसाठी काम करणा-या नमिता कोहोक या स्वत: कॅन्सरवर मात करून आनंदी जीवन जगत आहे. त्यांचा कॅन्सर बरोबर लढा देण्याचा अनुभवही बरंच काही सांगणारा आहे, कुटूंबाच्या पाठिंब्यामुळे कणखरपणे या संकटाचा त्यांनी सामनाच केला नाही, त्या संकटावर मातही केली आहे. नमिता यांच्या कॅन्सरविरोधांतील लढयाबद्दलचा अनुभवही त्यांनी स्वत: उपस्थित महिलांना सांगितला. महिलांच्या आरोग्यविषयक समस्यांबाबत महिलांना जागरूक करणे हा या कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश असल्याचे ग्रामीण पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो. यांनी प्रतिपादन केले. यावेळी जिल्हयातील सखीमंच प्रतिनिधी, पोलीस सखी, पोलीस अधीक्षक कार्यालयातील महिला लिपीक व महिला पोलीस कर्मचारी, तसेच महाविद्यालयीन तरूणींनी या कार्यक्रमास मोठया प्रमाणात उपस्थिती नोंदविली.